# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.12.2024** **वारःशुक्रवार**

---

1. महाराष्ट्राचे 21 वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा, तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा शपथविधी,
2. उद्यापासून 9 डिसेंबरपर्यंत विधानसभेचं विशेष अधिवेशन,
3. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमीवर जनसागर, आणि
4. बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आजपासून.

**<u>शपथविधी सोहळा</u>**

राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल शपथ घेतली. मुंबईत आझाद मैदानावर झालेल्या समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी फडणवीस यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. याच समारंभात उपमुख्यमंत्री म्हणून शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनीही शपथ घेतली. शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्यासह केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान, जे.पी. नड्डा, रामदास आठवले, यांच्याबरोबरच अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तसंच उद्योग, क्रीडा, चित्रपटसृष्टीसह इतर क्षेत्रातले मान्यवरही यावेळी उपस्थित होते. याखेरीज देशभरातून आलेले भाजपाचे अनेक नेते, पदाधिकारी आणि नागरिक यांची उपस्थिती लक्षणीय होती. राज्याचे एकविसावे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणारे देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कारकीर्दीचा हा धावता आढावा....

**देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस, गेल्या दहा वर्षांपासून राज्याचं राजकारण ज्या नावांभोवती फिरत होतं; त्यातलं महत्त्वाचं नाव. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी, त्यानंतर नागपूरमध्ये नगरसेवक आणि सर्वात तरुण महापौर आणि नंतर आमदार आणि राज्याचे मुख्यमंत्री असा त्यांचा अत्यंत झंजावाती राजकीय प्रवास आहे. 1999 मध्ये ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडन आले. त्यानंतर यंदा सलग सहाव्यांदा ते आमदार म्हणून विजयी झाले. 2014 मध्ये भाजपाचे प्रदेशाध्यक्ष असताना राज्यात भाजपाला पहिलं मोठं यश मिळाल्यानंतर, सलग पाच वर्षांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द पूर्ण करणारे ते दुसरे मुख्यमंत्री ठरले. त्यानंतर 2019 मध्येही, मी पुन्हा येईन असं ते म्हणाले आणि, पुन्हा एकदा जनतेचा कौलही मिळवला, पण शिवसेनेनं घेतलेल्या वेगळ्या भूमिकेमुळे सत्ताकारणाची चक्र फिरली. त्यानंतर अजित पवार यांच्यासमवेत तयार केलेलं 72 तासांचं सरकार, नंतर झालेल्या सत्तानाट्यानंतर मिळालेलं विरोधीपक्ष नेते पद, आणि त्यानंतर शिवसेनेतील बंडानंतर मिळालेलं उपमुख्यमंत्रीपद... पद कोणतंही असो, त्याला पूर्ण**

**न्याय देत, ते अत्यंत अभ्यासपूर्ण चोख पद्धतीनं पार पाडायचं कसब देवेंद्र फडणवीस यांना अवगत आहे. मुख्यमंत्री असताना प्रामुख्यानं राज्यातला सिंचनाचा प्रश्न सोडवण्यावर आणि शहरी भागात पायाभूत सुविधांचे प्रकल्प उभारण्यावर त्यांनी भर दिला. विरोधीपक्ष नेतेपदी असताना अत्यंत आक्रमकपणे सत्ताधाऱ्यांना हादरे देत त्यांनी विरोधी पक्ष नेतेपदाची भूमिकाही चोख बजावली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्याबरोबर सत्ता स्थापन करताना पक्षाच्या आदेशानुसार उपमुख्यमंत्रीपद स्वीकारून पुन्हा एकदा त्यांनी आपल्यातला कार्यक्षम प्रशासक राज्याला दाखवून दिला आणि त्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीत झालेला पराभव आणि नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेलं उदंड यश... असा मोठा चढउतार असलेला त्यांचा राजकीय पट... या काळात प्रचंड लोकप्रियता आणि त्याचवेळी टोकाची टीका अत्यंत संयमानं त्यांनी सहन केली. कायद्याचे पदवीधर, परदेशातून व्यवसाय व्यवस्थापनाची पदविका घेतलेले देवेंद्र फडणवीस अत्यंत अभ्यासू नेते, चाणाक्ष राजकारणी आणि कुशल प्रशासक आहेत. मुख्यमंत्री म्हणून राज्याचं नेतृत्व करताना एकीकडे अनेक आव्हानांवर मात करणं, आणि त्याचवेळी राज्याच्या विकासाची गती कायम ठेवत महायुतीनं जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचं कामही देवेंद्र फडणवीस यांना करावं लागणार आहे. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्याबरोबरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनाही शुभेच्छा. आकाशवाणी बातम्यासाठी माथवी कुलकर्णी, पुणे.**

**<u>पहिली स्वाक्षरी</u>**

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर  पहिली स्वाक्षरी केली. पुण्यातील चंद्रकांत कुऱ्हाडे या गरजू रुग्णाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून पाच लाखाची मदत देण्याचे निर्देश त्यांनी यामध्ये दिले आहेत.

**<u>पत्रकार परिषद</u>**

'राज्याला स्थिर आणि लोकाभिमुख सरकार देऊ', अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. महायुतीच्या जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासनं पूर्ण करायच्या अभिवचनाचा  पुनरुच्चार त्यांनी केला. 'नव्या विधिमंडळात विरोधकांची संख्या कमी असली, तरी त्यावरून त्यांचं मूल्यमापन करणार नाही. त्यांनी मांडलेल्या योग्य विषयांचा सन्मान करू', असंही फडणवीस यांनी सांगितलं. 7 ते 9 डिसेंबर या कालावधीत विशेष अधिवेशन घेऊन विधानसभा अध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण करून राज्यपालांचं अभिभाषण व्हावं, यासाठीची शिफारस राज्यपालांना केली असल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली.

**<u>महापरिनिर्वाण दिन</u>**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा आज 68 वा महापरिनिर्वाण दिन आहे. यानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर राज्यभरातून मोठ्या संख्येनं अनुयायी दाखल झाले आहेत. या अनुयायांना सुविधा पुरवण्यासाठी मुंबई महापालिकेनं जय्यत तयारी केली आहे. पालिकेनं चैत्यभूमी परिसरात नियंत्रण कक्ष उभारला असून रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या

पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, शौचालये अशा सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. बृहन्मुंबई महानगर पालिकेचे सहाय्यक आयुक्त अजित कुमार आंबी या सुविधांची माहिती देताना म्हणाले....

**भीमातुम्हा वंदना**

महापरिनिर्वाणदिनानिमित्त बृहन्मुंबई महापालिकेच्या जनसंपर्क विभागानं बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनपटावर आधारित छायाचित्र प्रदर्शनही भरवलं आहे. तत्पूर्वी काल महानगरपालिकेनं तयार केलेल्या 'भीमा तुम्हा वंदना' या माहिती पुस्तिकेचं प्रकाशनही करण्यात आलं.

**प्रोबा प्रक्षेपण**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून काल दुपारी प्रोबा-3 या उपग्रह वाहून नेणाऱ्या PSLV C 59 या प्रक्षेपकाचं यशस्वीरित्या प्रक्षेपण केलं. युरोपीय अंतराळ संस्थेच्या प्रोबा 3 उपग्रहांना यशस्वीरीत्या कक्षेत स्थापित करण्यासाठी पीएसएलव्ही सी 59 चं प्रक्षेपण करण्यात आलं असल्याची माहिती इस्रोनं या प्रक्षेपणानंतर एक्स या समाजमाध्यमावरून दिली आहे. प्रोबा 3 ही युरोपियन अंतराळ संस्थेची महत्त्वाची मोहीम असून त्याअंतर्गत आणखी दोन उपग्रह अंतराळात सोडण्यात आले आहेत.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतील दुसरा सामना आजपासून सुरू होत आहे. ॲडलेड इथल्या ओव्हल मैदानावर हा सामना दिवस-रात्र खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी साडेनऊ वाजता सामना सुरू होईल. यापूर्वी पर्थ इथं झालेला पहिला सामना जिंकून भारतानं या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.